5

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार - ब

वर्ष २, अंक ७३ (३)] गुरुवार, ऑक्टोबर २१, २०१०/आश्विन २९, शके १९३२ [पृष्ठे १०
किंमत : रुपये २८.००

**असाधारण क्रमांक १४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑक्टोबर २०१०

**आदेश**

**महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.**

क्रमांक मपवि २०१०/ प्र. क्र. १३१/१ पदुम-१ (अ).— महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (१९९८ चा महा. १७) याच्या कलम १६, पोट-कलम (२ क) च्या खंड (ड) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, कुलपतींशी विचारविनिमय करून, याद्वारे, विनिर्दिष्ट करीत आहे की, कुलगुरू पदाच्या नियुक्तीसाठी समितीने शिफारस केलेली व्यक्ती ही, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या भाग 'अ' मध्ये घालून दिलेल्या आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि उक्त अनुसूचीच्या अनुक्रमे भाग 'ब' व भाग 'क'

मध्ये घालून दिलेला इष्टतम अनुभव, अपेक्षित कौशल्य व क्षमता धारण करणारी असेल.

## अनुसूची

### भाग 'अ'

**आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव.—**(१) पशुवैद्यक शास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र अथवा मत्स्यविज्ञान या क्षेत्रातील डॉक्टरेट आणि शैक्षणिक क्षेत्रातील चांगला पूर्वेतिहास ;

(२) पशुवैद्यक शास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र अथवा मत्स्यविज्ञान या क्षेत्रातील संशोधन किंवा विस्तार शिक्षण अथवा अध्यापन यामधील पदवीपूर्व आणि/किंवा पदव्युत्तर स्तरावरील किमान १५ वर्षांचा अनुभव ;

(३) किमान ५ संशोधन पेपर किंवा मान्यताप्राप्त अशा आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नल किंवा राष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये १५ संशोधन पेपर प्रकाशित केलेले असावेत आणि/किंवा पशुवैद्यकशास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र अथवा मत्स्यविज्ञान यांमध्ये गुणात्मक दर्जा असलेली व राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षणासाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरली जातील अशी नावाजलेली पुस्तके प्रकाशित केलेली असावीत ;

(४) महत्त्वपूर्व अशा किमान एका संशोधन प्रकल्पाचे संचलन केलेले असावे ;

(५) आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना यांच्या देशाबाहेरील व देशातील कार्यशाळा, चर्चासत्र (सेमिनार) किंवा परिषदा यांमध्ये सहभागात्मक स्वरूपाच्या कार्याचा अनुभव असावा ;

(६) पशुवैद्यकशास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र अथवा मत्स्यविज्ञान या क्षेत्रामध्ये राष्ट्रीय स्तरावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, चर्चासत्र, परिषदा यांचे आयोजन करण्याचा अनुभव व सहभाग ;

(७) प्राध्यापकापेक्षा कमी दर्जा नसलेला असा विभाग प्रमुख किंवा विद्यापीठाशी संलग्नीत किंवा संविधायी संस्थेचा अथवा महाविद्यालयाचा सहयोगी अधिष्ठाता किंवा प्रगत अध्यायन (ॲडव्हान्स लर्निंग) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेचा प्रमुख म्हणून प्रशासनातील कामाचा किमान ५ वर्षांचा अनुभव ;

(८) सप्रमाण नेतृत्वाचा अनुभव.



### भाग 'ब'

**ऐच्छिक (इष्ट) अनुभव.—** (१) विद्यापीठाच्या संविधानिक प्राधिकरणावरील कार्यकारी परिषद, विद्या परिषद, विद्याशाखा आणि अभ्यास मंडळ इत्यादी यामधील कार्याचा अनुभव ;

(२) दर्जात्मक बाबी, अधीस्वीकृती (Assessment) व मूल्यनिर्धारण (Accreditation) ई. प्रक्रीया हाताळण्यांचा प्रत्यक्ष अनुभव ;

(३) पी.एच.डी. करणा-या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा अनुभव ;

(४) महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यामधील तरतुदीनुसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी राज्य किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थीकेंद्रित कार्यक्रम राबवण्याचा अनुभव.

### भाग - 'क'

**अपेक्षित कौशल्य व क्षमता :—**

**(१) तंत्रज्ञानात्मक कौशल्य.—** (क) नवीनतम तंत्रज्ञानाचा खुलेपणाने अंगीकार करणे आणि त्या तंत्रज्ञानाच्या ज्ञानाधारीत संभाव्य उपयुक्ततेबाबत प्रगट दृढ विश्वास ;

(ख) तंत्रज्ञानाच्या वापराबाबत उच्च पातळीवरील हातोटी.

**(२) व्यवस्थापकीय कौशल्य.—** (क) संसाधनांची निर्मिती व त्यांचे न्यायवाटप करण्याची योग्यता ;

(ख) अपेक्षित समस्या व घटनांवर मात करण्याची व त्यासाठी आधीपासून डावपेचात्मक आराखडा तयार करण्याची योग्यता ;

(ग) दबावाला न जुमानता परिणामकारकपणे काम करण्याची तसेच कामाचे व्यवस्थापन व उपलब्ध संसाधनाचा कालमर्यादेत वापर करण्याची क्षमता ;

(घ) वित्तीय व्यवस्थापन उदा. उत्पन्न स्त्रोताची निर्मिती, त्यांचे नियोजन व वित्तीय नियंत्रण इत्यादी बद्दलचे प्रगल्भ ज्ञान.

**(३) राज्य पातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवरील संस्था, व्यावसायिक संघटना इत्यादींशी सहकार्य करार.—** (क) महत्त्वाच्या क्षेत्रातील समाजाच्या अपेक्षा व गरजा ओळखण्याची क्षमता ;

(ख) राष्ट्रापुढील आव्हानांचे सखोल ज्ञान आणि राष्ट्राच्या विकासात्मक गरजांना उच्च शिक्षण कसे प्रतिसाद देऊ शकेल याबाबतचे ज्ञान ;

(ग) अभ्यासक्रमांच्या विकासाबाबत विशेषतः समाजाचा अंतर्भाव व सहभाग विस्तृतपणे वाढविणा-या अभ्यासक्रमांची विशेष जाण.

**(४) नेतृत्व क्षमता.**— (क) विविध लाभार्थी गटांना उद्युक्त करण्याची अपवादात्मक क्षमता ;

(ख) संस्थेचे किंवा संघटनेचे ध्येय व उद्दिष्ट पुढे नेण्याची प्रबळ इच्छाशक्ती ;

(ग) डावपेचात्मक आणि सृजनात्मकदृष्ट्या व विस्तृतपणे विचार करण्याची क्षमता ;

(घ) स्वउदाहरणाने नवीन कल्पनांचा अंगीकार व त्या संवादात्मक दृष्टीकोनातून राबविण्याची क्षमता.

**(५) संवादात्मक आणि सहकार्यात्मक कौशल्य.**— (क) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्याच्या विकासामध्ये व अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय यश ;

(ख) वरिष्ठ पातळीवर व मोठया व्यासपीठावर तसेच वैयक्तिक पातळीवर स्वतःच्या सखोल ज्ञानाच्या आधारे परिणामकारकपणे संवाद साधण्याची व मतपरिवर्तन करण्याची क्षमता ;

(ग) समयोचित क्षेत्रातील व्यावसायिक संस्था व संघटनांचे सक्रीय सदस्यत्व.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल डिग्गीकर,**
शासनाचे सचिव.



## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 19th October 2010.

### Order

MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY ACT, 1998.

No.MPV-2010/C.R. 131/ ADF-1(A).— In exercise of the powers conferred by clause (*d*) of sub-section (*2C*) of section 16 of the Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1983 (Mah. XVII of 1998) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby specifies that the person being recommended by the Committee for appointment as Vice-Chancellor shall possess the essential educational qualifications and experience as set out in Part 'A' of the Schedule appended hereto; and desirable experience, expected skills and competencies set out in Part 'B' and Part 'C', respectively of the said Schedule.

### *SCHEDULE*

PART 'A'

*Essential Educational Qualifications and Experience.*— (1) Earned Doctor of Philosophy (Ph.D.) in Veterinary Sciences or Dairy Technology or Fishery Sciences and good academic record.

(2) Experience in the field of research or extension education or teaching in the field of Veterinary Sciences or Dairy Technology or Fishery Sciences for at least 15 years at the undergraduate and / or postgraduate level ;

(3) Minimum of five research publications in peer-reviewed or referred international research journals or should have published 15 research publication in national research journals and or should have published quality books in Veterinary Sciences or Dairy Technology or Fishery Sciences, referenced for study in higher education at the National or International level ;

(4) Execution of at least one major research project ;

(5) Experience of working with international bodies or international exposure through participation in workshops, seminars or conferences held outside and within the country ;

(6) Participation and experience of organizing events such as workshops, seminars, conference at international level within the country in the field of Veterinary Sciences or Dairy Technology or Fishery Sciences;

(7) At least 5 years of experience in the administration not below the rank of Professor as Head of the Department or Associate Dean of the affiliated or constituent Institute or Colleges of a University or Head of a national or international level Institute of advanced learning ;

(8) Demonstrable experience in leadership.

PART 'B'

*Desirable Experience.*— (1) Experience of working on the Statutory Authorities of a University such as Executive Council, Academic Council, Faculties and Board of Studies etc.;

(2) Demonstrable experience of handling quality issues, assessment and accreditation procedures, etc ;

(3) Experience to guide Ph.D. students ;

(4) Experience at the State or National or International level in handling youth development work such as organizing student-centric activities for their all-round development and for providing them rich campus life as envisaged in the Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1998.

PART 'C'

*Expected Skills and Competencies.*—

(1) *Technical Skills.*— (*a*) Openness towards adopting latest technology and a deep conviction regarding its potential applications based on the knowledge ;

(*b*) Reasonably high level of comfort in the use of technology ;

(2) *Managerial Skills.*— (*a*) Ability to generate resources and allocate the same appropriately ;

(*b*) Ability to anticipate problems and issues and prepare advance strategic plans ;

(*c*) Capacity to work effectively under pressure and manage work and resources within tight deadlines;

(*d*) Good understanding of financial management including revenue generation, planning and fiscal control;

(3) *Alignment with corporate objectives and State as well as National level priorities.*— (*a*) Ability to identify the expectations and needs of the communities in key sectors ;



(*b*) Deep understanding of the challenges before the Nation and how Higher Education can respond to developmental needs ;

(*c*) Demonstrable understanding of curriculum development issues, especially those relating to widening participation and social inclusion ;

(4) *Leadership Skills.*— (*a*) Exceptional ability to motivate a divers group of stakeholders ;

(*b*) Keen desire to further the mission and goals of the institute or the organization ;

(*c*) Ability to think strategically and innovatively and maintain a broad perspective ;

(*d*) Ability to lead by personal example with openness to new ideas and a consultative approach in implementation of the same ;

(5) *Interpersonal Communication and Collaborative Skills.*— (*a*) Demonstrable success in developing and executing National and International collaborative arrangements;

(*b*) Ability to interact effectively and persuasively with a strong knowledge-base at senior levels and in large forums as well as on a one-to-one basis;

(*c*) Evidence of being an active member of professional bodies and associations in pertinent fields.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DIGGIKAR,
Secretary to Government.

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑक्टोबर २०१०.

### आदेश

**महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.**

क्रमांक मपवि २०१०/प्र. क्र. १३१/पदुम-१ (अ).— महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (१९९८ चा महा. १७) याच्या कलम १६ च्या पोट-कलम (१) खंड (अ) च्या उप-खंड (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, विद्यापीठाच्या कुलगुरु पदाच्या नियुक्तीसाठी कुलपतीने योग्य नावांची शिफारस करण्यासाठी घटीत केलेल्या समितीचा सदस्य नामनिर्देशित करण्याची रीत विनिर्दिष्ट करीत आहे.

(एक) विद्यापीठाच्या कुलगुरु पदाच्या नियुक्तीसाठी कुलपतीने योग्य नावांची शिफारस करण्यासाठी घटीत केलेल्या समितीचा सदस्य नामनिर्देशित करण्याच्या प्रयोजनार्थ विद्यापीठ, त्याच्या कुलगुरु मार्फत कार्यकारी परिषद आणि विद्यापरिषद यांची एक संयुक्त बैठक बोलावील. अशा बैठकीची सूचना विद्यापीठाच्या नेहमीच्या प्रथेनुसार अशा बैठकीच्या दिनांकाच्या किमान १५ दिवस अगोदर कार्यकारी परिषदेच्या व विद्यापरिषदेच्या सदस्यांना पाठविण्यात येईल.

(दोन) तथाकथित संयुक्त बैठकीचे अध्यक्षपद कुलगुरुकडून भूषविण्यात येईल.

(तीन) कलम १६ च्या पोट-कलम (१) खंड (अ) च्या उक्त उप-खंड (दोन) अन्वये अर्हताप्राप्त सदस्याच्या नामनिर्देशना बाबतचा निर्णय बहुमताने घेण्यात येईल.

(चार) मतदानाची रीत, आवश्यक असल्यास मतमोजणी इत्यादी सह संयुक्त बैठकीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती कुलगुरुकडून ठरविण्यात येईल.

(पाच) कोणत्याही सदस्याला एका पेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार असणार नाही. समसमान मते पडल्यास कुलगुरुंचे मत हे निर्णायक असेल.

(सहा) कुलगुरु संयुक्त समितीच्या बैठकीनंतर तात्काळ कुलपतीला अशा बैठकीमध्ये नामनिर्देशित केलेल्या सदस्याचे नाव कळवील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल डिग्गीकर,**
शासनाचे सचिव.



## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya Annex, Mumbai 400 032, dated the 19th October 2010.

### Order

MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY ACT, 1998.

No. MPV-2010/C.R. 131/ ADF-1(A).- In exercise of the powers conferred by sub-clause (ii) of clause (a) of sub-section (*1*) of section 16 of the Animal and Fishery Sciences University Act, 1998 (Mah. XVII of 1998) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, hereby specifies the manner of nominating the member of the Committee to be constituted to recommend suitable names to the Chancellor for appointment of the Vice-Chancellor of the University as follows, namely :—

(i) The University through its Vice-Chancellor shall convene a joint meeting of the Executive Council and the Academic Council for the purpose of nominating the member of the Committee to be constituted to recommend suitable names to the Chancellor for appointment of the Vice-Chancellor of the University. The notice of such meeting shall be sent to the Members of the Executive Council and the Academic Council at least 15 days prior to the date of such meeting as per usual practice of the University.

(ii) The joint meeting so called shall be presided over by the Vice-Chancellor.

(iii) The decision regarding the nomination of the Member qualified under the said sub-clause (ii) of clause (a) of sub-section (*1*) of section 16 shall be arrived at by a majority.

(iv) The procedure to be followed in the joint meeting including the manner of voting, if required, counting of votes, etc. shall be decided by the Vice-Chancellor.

(v) No Member shall have more than one vote. In case of equality of votes, the Vice-Chancellor shall have a casting vote.

(vi) The Vice-Chancellor shall communicate the name of the Member so nominated in the joint meeting to the Chancellor immediately after such meeting.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DIGGIKAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.